
सुरेंद्र पाथरकर
अंतिम लढत

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अंतिम लढत

(कथासंग्रह)

## लेखक : सुरेंद्र पाथरकर

# अंतिम लढत

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

अंतिम लढत

लेखक :   सुरेंद्र पाथरकर

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप –८५५४८३६९८९

ई मेल -- : Patharkar.sp@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २२ मार्च २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखकाची ओळख

## सुरेंद्र पाथरकर



सुरेंद्र पुरुषोत्तम पाथरकर,

निवृत्त अधीक्षक, सेन्ट्रल वेअरहाउस,

सध्या LIC/Med claim  Advisor

वडील कै.पुरुषोत्तम पाथरकर, प्राथमिक शिक्षक,सरस्वती विद्यालय, नासिक.

पत्ता: ”आशीर्वाद”बंगला न.०३,कोणार्क नगर-२, आडगाव शिवार,पंचवटी,नाशिक-४२२००३.

संपर्क: ०२५३-२३०३७८३,

मोबाईल: ८५५४८३६९८९,

EMAIL: patharkar.sp@gmail.com

मनोगत:

लहानपणापासून लिहिण्याची आवड. 1975 to 1980 च्या दरम्यान नासिकच्या गावकरी वर्तमानपत्रात ,काही सामाजिक विषयांवर लेख लिहले होते. सेन्ट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशन मधे ३९ वर्ष सेवा झाली, तेव्हा हेड ऑफिस दिल्ली वरून हिंदीमध्ये त्रिमासिक प्रसिद्ध होत असे त्यात माझ्या हिंदी भाषेत कथा श्रृंखला 1,२,३,४,५,६,७ प्रसिध्द झाल्या आहेत. नंतर कामाच्या व्यापामुळे निवृत्तीपर्यंत लिखाणाला वेळ देता आला नाही. फेब्रुवारी २०१५ ला निवृत्त झाल्यावर मात्र ठरवून लिखाणासाठी वेळ काठला.

“ अंतिम लढत “ ही अतिशय सुरस कथा असून शेवट पर्यंत उत्सुकता वाढवणारी आहे. मातृभूमीचे रक्षण करतांना राकेशला जे थरारक अनुभव येतात ते सत्यावर आधारित आहेत. तरुणपिढीला ही चांगली मार्गदर्शक ठरेल ही अपेक्षा. वाचकांच्या प्रेमळ आग्रहामुळे यापुढे अजून वाचनीय कथा लिहिण्याचा प्रपंच करणार आहे.

लेखक: सुरेंद्र पाथरकर

: Patharkar.sp@gmail.com

: ८५५४८३६९८९

# प्रस्तावना-अंतिम लढत

माझे स्नेही श्री. सुरेंद्र यांनी आग्रहपूर्वक विनंती केली त्यांच्या विनंतीला मान देऊन आपणही दोन शब्द लिहावे या दृष्टिकोनातून थोडक्यात प्रस्तावना लिहिण्याचा प्रयत्न करत आहे.

श्री. सुरेंद्र पाथरकर साहेब कोणार्क नगर-२ येथे रहावयास आल्यापासून म्हणजे जवळपास १० ते १५ वर्षापासून त्यांचा व माझा परिचय आहे. ते शांत व मनमिळाऊ असल्यामुळे जरी आम्ही वेगवेगळया ठिकाणी नोकरी करत होतो तरी त्यांची व माझी मैत्री जमली.त्यांना समाजासाठी काहीतरी करण्याचा ध्यास पण आहे. सोसायटीतील मुलांसाठी ते कोणार्क नगर वाचनालयाच्या माध्यमातून निरनिराळे उपक्रम राबवत असतात. त्याचे इंग्रजीवर प्रभुत्व आहे तेवढेच हिंदी व मराठीवर पण आहे.

सेन्ट्रल वेअरहाउस मधून अधीक्षक पदावरून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी लेखनाच्या आपल्या आवडल्या क्षेत्रात पाय टाकला. या पूर्वी बुकगंगा प्रकाशनातर्फे तीन कथांचे पुस्तक " प्रारब्ध " प्रसिद्ध करण्याची संधी मिळाली त्यामुळे त्यांचा उत्साह चांगलाच वाढला आहे.

त्यांची "अंतिम लढत" ही अतिशय सुंदर कथा असून तरुणांसाठी मार्गदर्शक अशी कथा आहे. भारताच्या रक्षणासाठी राकेश सहभागी असलेले वेगवेगळे सिक्रेट मिशन अंगावर काटा आणणारे आहेत. प्रत्येकाने वाचलीच पाहिजे अशी ही कथा आहे. श्री.पाथरकर यांनी असेच लिहित राहो त्यासाठी त्यांना चांगले आरोग्य लाभो ही प्रार्थना करून त्यांच्या भावी लेखन कार्यासाठी शुभेच्छा.

नरेंद्र त्रिंबक कुलकर्णी,

उपाध्यक्ष कोणार्क नगर-२, वाचनालय,

बंगला नंबर ८६, कोणार्क नगर-२,आडगाव शिवार,पंचवटी, नाशिक-३.मोबाईल: 9823437010.

अर्पणपत्रिका:

माझी पत्नी सौ. मिनल जिने खंबीरपणे संसार शून्यातून उभा करण्यात नेहमीच मला साथ दिली तसेच माझ्या जीवनातील संकट प्रसंगात मला आधार देऊन मार्गदर्शन करणाऱ्या अनेक ज्ञात/अज्ञात व्यक्तींना अर्पण ...........

सुरेंद्र पाथरकर

# अंतिम लढत

(कथा पूर्ण काल्पनिक असून स्थळ, काळ, व्यक्ती यात साधर्म्य आढळ्यास केवळ योगायोग समजावा)

लेखक: सुरेंद्र पाथरकर

: Patharkar.sp@gmail.com

: ८५५४८३६९८९

मोबाईल मधील सुमधुर गजराच्या आवाजाने राकेश ची झोप उडाली. पहाटेचा ४.३० चा गजर वाजला होता. गॅस वर दुधाचे आधण ठेऊन राकेश ब्रश करू लागला. फ्रेश झाल्यावर शूज व ड्रेस घातल्यावर मगमधे दुध घेऊन त्यात एक चमच्या बोर्नव्हिटा टाकून सावकाश पिऊ लागला. सायकल काढून फडक्याने साफ केली व टांग मारून जिमच्या दिशेने निघाला. खांद्यावरच्या बॅग मधे नेहमीप्रमाणे पाण्याची बाटली व एक नॅपकीन होताच.

---

राकेश सांगलीतील विश्रामबागेत एक रूम घेऊन राहत होता. सांगलीजवळील एका खेड्यात त्याचे घर होते. घरी आई व छोटा भाऊ उमेश राहत होते. वडिलांचा दोन वर्षा पूर्वी सांगलीहून परत येत असतांना बस अपघातात मृत्यू झाला होता. वडिलांना राकेशला व उमेशला खूप शिकवून मोठे अधिकारी बनवायचे होते. पण अचानक त्यांचे निधन झाल्याने सर्वांना मोठा धक्का बसला होता. गावातील जोशीकाकांनी कुटुंबाला धीर दिला. राकेश पहिल्या पासूनच खूप हुशार होता. इंजिनियरिंगची पदवी घेण्यासाठी जोशी काकांनी थोडी आर्थिक मदत केली व सांगलीच्या कॉलेजमधे ॲडमिशन घेऊन दिली व जवळील विश्रामबागेत एक रूम घेऊन दिली.

राकेशला वडिलांच्या स्वप्नाची कायम आठवण होती. प्रत्येक वर्षी चांगले मार्क मिळउन राकेश आता पदवी परीक्षेचा अभ्यास करत होता. त्याबरोबरच रोज जिम मधे जाऊन दोन तास व्यायामाचा सराव करण्याचा नियम काटेकोरपणे पाळला होता. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर निरोगी सुदृढ कमवलेल्या शरीराचे महत्व वडिलांनी राकेशच्या मनावर बिंबवले होते.

---

नेहमीप्रमाणे राकेश कॉलेजला पोहचला. मित्रांचा ग्रुप त्याची वाटच बघत होता. परीक्षेला आता एक महिनाच बाकी असल्याने सगळे अभ्यासाच्या बाबतीत सिरीयस झाले होते. एकाही पिरियडला अबसेन्ट न राहता सर्व पिरीयड हजर राहण्याचे सर्वांनी मनापासून ठरवले होते. इंजिनियरिंगच्या शेवटच्या वर्षाला असल्याने कॉलेज मधील धमाल याकडे त्यांनी हेतुपूर्वक दुर्लक्ष केले होते.

लौकरच परीक्षा झाली. राकेशला फर्स्ट क्लास मिळेल अशी खात्री होती. परीक्षेचे ट्रेन्शन नसल्याने राकेश गावी आला होता व प्रत्येक दिवस लहान भाऊ उमेश बरोबर फिरण्यात, पिच्चर बघण्यात आनंदात घालवत होता. पण त्या बरोबरच पदवी मिळयाल्यावर पुढे काय करायचे याचा गंभीरपणे विचार करीत होता. नोकरीसाठी अर्थातच प्राधान्य होते कारण लहान भाऊ उमेशची जबाबदारी त्याच्यावर होती. रोज राकेश वेगवेगळे वर्तमानपत्र घेऊन चाळत असे. त्यात आलेल्या जाहिराती काळजीपूर्वक वाचत असे. जोशीकाकांनी पदवी मिळाल्यावर स्वतःचा कारखाना टाकण्याचा सल्ला दिला होता. पण भांडवला अभावी हे शक्य नसल्याने राकेशने या सल्ल्याकडे दुर्लक्ष केले होते. पुढील वर्षभरात राकेश व गोपालने जो त्याचा जवळचा खास मित्र होता, नोकरी मिळण्यासाठी अनेक कंपनीमध्ये, सरकारी ऑफिसमधे अर्ज केले, मुलाखती दिल्या पण अनेक कारणांनी सगळी कडून निराशा झाली. कुठे नातेबाईकानाच नोकरी दिली गेली होती, मुलाखत फक्त फार्स होता, तर कुठे सरळसरळ पैशाची मागणी होत होती. साधी एस्टी मधे कंडक्टरच्या नोकरी साठी १५ हजार ते २० हजार रुपये द्यावे लागत होते. सगळीकडे करप्शनचे जाळे पसरले होते. प्रामाणिकपणे शिकून सुद्धा नोकरी मिळवण्यासाठी मिळणाऱ्या अपयशाने राकेश व गोपाळ पुरते खचून गेले, निराश झाले होते.

आपल्यासारखे अनेक शिकलेले तरूण बेरोजगार फिरत असल्याचे दोघांच्या लौकरच लक्षात आले. एकदिवस वर्तमानपत्र वाचत असतांना गोपालची नजर एका बातमीने वेधून घेतली. सातारला सैन्य भरती साठी तरुणांना आवाहन केले होते. गोपाल लगेच राकेशला भेटला. दोघांनी बातमी सविस्तर नीट वाचली. बातमीत दिल्या प्रमाणे शिक्षण, उंची, वजन, छाती इत्यादी अटी मधे दोघेही बसत असल्याने दोघांनी सातारला सैन्य भरतीच्या मुलाखतीसाठी जायचे पक्के ठरवले. मुलाखतीला अजून एक महिना अवकाश होता. घरी सांगावे की नाही यावर दोघांचे एकमत नव्हते. गोपालने घरी सांगायचे ठरवले कारण विरोध होणार नव्हता याची खात्री होती. मात्र राकेश घरी कसे सांगावे या विचारात होता कारण घरी आई नक्की विरोध करणार होती. सिलेक्शन झाल्यावर पुढचे पुढे बघू असा त्यांने विचार केला.

पहाटे ५ वाजता उठून सुरवातीला पाच नंतर दहा किलोमीटर पळण्याचा सराव दोघांनी सुरु केला. गोपाळला सुरवातीला सवय होई पर्यंत त्रास झाला पण राकेशला पहिल्यापासूनच जिम मधे जाऊन व्यायाम करण्याची सवय असल्यामुळे त्याला काहीच त्रास जाणवत नव्हता. राकेशच्या मनात काय चालले आहे याचा थांगपत्ता त्याच्या आईला होत नव्हता. जोशी काकांनी एकदा त्याला आडून विचारण्याचा प्रयत्न केला पण राकेशने शिताफीने उत्तर देण्याचे टाळले. सिलेक्शन झाले नाही तरी व्यायामाने कमवलेले शरीर वाया जाणार नव्हते ही खात्री दोघांना होती. गावाजवळून वाहणाऱ्या नदीवर जाऊन दोघेही रोज दोन तास पोहण्याचा सराव करू लागले. सातारला मुलाखतीला जाण्याचा दिवस जसजसा जवळ येत होता तसतशी दोघांची उत्सुकता शिगेला पोहचली होती. एकदाचा तो दिवस उगवला सकाळी सहा वाजता एस.टी. ने दोघे निघाले. त्याआधी राकेशने देवघरातील देवांना, आईला, वडीलांच्या फोटोला नमस्कार केला. आईने घरात जाऊन वाटीत दही साखर आणले व राकेशच्या हातावर ठेवले. आईला राकेश फक्त सातारला नोकरीच्या मुलाखतीसाठी जात आहे एवढेच माहित होते. उमेश दोघांना सोडायला बस स्थानका पर्यंत आला होता. उमेशला पण काहीही कल्पना नव्हती.

सातारच्या सैनिक ऑफिसच्या आवारात भरती साठी उमेदवारांची खूप गर्दी झाली होती. साताऱ्यातील सैनिक शाळा भारतातील एक प्रसिद्ध सैनिक शाळा आहे. तिथे शिकलेली अनेक मान्यवर आता वेगवेगळ्या क्षेत्रात प्रसिद्ध आहेत. माननीय निंबाळकर साहेब प्रसिद्ध सैनिक अधिकारी याच शाळेचे विद्यार्थी होते. सहा टेबलांवर अधिकारी बसले होते. लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या. पहिल्या टेबलावर उमेद्वाराने आणलेले कागदपत्र जमा करायचे होते. नंतर पुढच्या टेबला जवळ ठेवलेल्या वेईंग मशीनवर वजन करून तेथेच उंची, छाती चे माप द्यायचे असा नियम होता. त्यानंतर ग्राउंडला ठराविक वेळेत राउंड मारणे, लांब उडी, व गोळा फेक अश्या नोंदी करण्यात आल्या. शेवटी एका रूम मधे मेडिकल करण्यात येत होती. सगळे कपडे काढून खोकून दाखवावे लागे. सिलेक्शन झाल्यावर तुम्हाला घरी कळवण्यात येईल असे सांगून निरोप देण्यात आला.

सातारच्या सैन्य भरती मुलाखतीला दोन महिने होत आले. उत्तराची आतुरतेने दोघेही वाट पहात होते. एक दिवस दुपारी पोस्टमन गोपालच्या घरी पत्र देऊन गेला. संध्याकाळी गोपाल घरी आल्यावर त्याला काहीतरी पत्र आल्याचे कळले. उघडून वाचले तर त्याला खूप आनंद

झाला कारण त्याचे सैनिक भरतीसाठी सिलेक्शन झाले होते व तोंडी मुलाखतीसाठी सातारला बोलवले होते. त्याने लगेच राकेशला गाठून बातमी दिली.

राकेशला आनंद झालाच पण त्याला अजून पत्र न मिळाल्याने काळजीत होता. आपले सिलेक्शन झाले नसेल का? आपण कुठे कमी पडले का या विचारांनी डोके भिरभिरत होते.

नंतरचे दोन दिवस राकेश पोस्टमनची देवासारखी वाट पहात होता, पण पोस्टमन फिरकलाच नाही. तिसऱ्या दिवशी राकेश व उमेश दुपारची जेवणे झाल्यावर खाटेवर गप्पा मारत बसले होते. आई पडवीत होती. एवढ्यात पोस्टमनची हाक ऐकून आई बाहेर आली व पोस्टमन कडून पत्र घेतले. पत्र राकेशच्या नावावर होते. आईला उत्सुकता असल्याने पत्र राकेशच्या हातात देऊन तिथेच उभी राहिली. पत्र न उघडताच राकेश आनंदाने उड्या मारू लागला. उमेशला व आईला काही समजेनासे झाले. राकेशने दोघांना सविस्तर सांगितले. थोडावेळ सगळेच आनंदात होते. मात्र सैन्य भरतीत राकेशचे सिलेक्शन झाल्याचे नीट लक्षात आल्यावर मात्र आईच्या चेहरा बदलला. रागाने ती स्वयंपाकघरात निघून गेली. आईची समजूत कशी काढावी राकेशला काही उमजत नव्हते. संध्याकाळी गोपाळ, उमेश व राकेश नदी काठी भेटले. सगळयांनी नाचून आनंद व्यक्त केला. रात्री पोचायला रात्री उशीर झाला होता.

जोशी काकांना राकेशच्या आईने आपल्या मनातले दु:ख सांगितले. राकेश सैन्यात भरती झालातर आपल्यापासून दूर जाईल या कल्पनेनेच आईचे हृद्य पिळवटून निघत होते. पतीचे अकस्मात निधन झाल्यावर दोन्ही मुलांना जमेल तेवढ्या लाडाने वाढवले होते. दोघे करीत असलेल्या शैक्षणिक प्रगती समाधानकारक होती. आपल्या घराण्याचे नाव काढून जीवनात सुखी होतील असा विश्वास होता. पण अचानक सैन्यात भरती होण्याचे खूळ राकेशच्या डोक्यात कसे आले व ते कसे काढावे या विचाराने आईला काही सुचत नव्हते. जोशीकाका अनुभवी होते. आपल्या मित्राच्या मृतुनंतर देखील दोन्ही कुटुंबातील सलोखा कायम ठेवण्यात ते यशस्वी होते. कोणतीही अडचण सामंजस्याने सोडविण्यात त्यांचा हातखंड होता. प्रसंग बाका होता. आईच्या ममतेचा होता. त्यांनी आईला समजावून सांगितले. सैन्यात भरती होण्याचा राकेशचा निर्णय कसा बरोबर आहे हे त्यांनी सविस्तर सांगितले. राकेश आता आपल्या मातृभूमीची सेवा करणार आहे ही बाब नक्कीच अभिमानाची आहे. मी अनेक तरुणांना मोह, माया च्या चक्कर मधे अडकलेले बघीतले आहे. उच्च शिक्षित होऊन किंवा अगदी अशिक्षित तरून सुद्धा कमीतकमी वेळेत जास्तीतजास्त पैसा असा कमवता येईल याच विचारात असतात. काही जमले नाही तर

राजकारणात प्रवेश करतात. राजकारण म्हणजे निरपेक्ष समाजसेवा ही आपल्या वेळेची कल्पना आता नाहीशी झालेली आहे. आमच्या पिढीतील कष्टाचे महत्व कोणालाच नाही हेच दु:ख आहे. पण राकेशचे तसे नाही. त्याला विरोध करू नका. त्याने त्याच्या मनाने निर्णय घेतला आहे, कोणीही लादलेला नाही. त्याच्या आनंदात आपण आनंदाने सामील झालो तर सीमेवर तो मनापासून शत्रूला नेस्तनाबूत करू शकेल.

राकेश व गोपाल तोंडी मुलाखतीसाठी सातारला जाण्यास निघाले. आई कडून विरोध होईल अशी भीती राकेशला होती पण तसे काहीच झाले नाही. आई उत्साहात होती. दुपारचा जेवणाचा डबा तयार होता. आईने आनंदाने दहीसाखर देऊन राकेशला यशस्वी होण्याचा आशीर्वाद दिला. हा बदल कसा झाला असेल हे राकेशला कळत नव्हते. बसचा प्रवास संपून दोघे कधी सातारला पोहचले समजलेच नाही. आता पटांगण रिकामे होते. एका मोठ्या हॉल मधे २७ युवक मुलाखतीच्या तयारीत बसले होते. चौकशी नंतर कळले की साधारण २१०० उमेदवारानपैकी फक्त २७ जणांना अंतिम मुलाखतीसाठी निवडले गेले होते.

शाररीक क्षमतेच्या अटी व शैक्षणिक पात्रतेला प्राधान्य असल्यामुळे निवड खूप पारखून केली गेली होती. तोंडी मुलाखत फार पटकन आटोपली. गोपाळ व राकेशची निवड झाली होती. अजून सात जणांना फक्त निवडण्यात आले होते. पुढची ट्रेनिंग ची ऑर्डर सात दिवसात घरच्या पत्यावर येणार होती.

गोपाळ व राकेशच्या आनंदाला उधाण आले होते. गावातील, तसेच कॉलेज च्या मित्रांनी मिळून एक दिवसाची कोल्हापूरची पिकनिक काढली. १६ सीटर मिनी बस केली होती. ट्रेनिंगला जाण्यापूर्वी आई जगदंबेचे दर्शन घेण्याची सुप्त इच्छा दोघांच्याही मनात होती. जोतीबा दर्शन करून नंतर नरसोबाची वाडीला श्री गुरुदत्त चे दर्शन घेण्याचा योग जुळून आला. घरी आल्यावर उमेशची समजूत काढण्यात राकेशचा एक दिवस गेला. राकेश आता खूप लांब बॉर्डरवर लढायला जाणार यामुळे उमेश दु:खी होता. राकेशवर त्याचे खूप प्रेम होते. राकेशने त्याची समजूत काढली की बाबा प्रत्येकाच्या जीवनात असे प्रसंग येतात की ज्यामुळे जीवनाला पूर्ण कलाटणी मिळते. आलेल्या संधीचा उपयोग करून घ्यायचा असतो. अशी संधी दवडल्यास आयुष्याच्या शेवटपर्यंत एक खंत मनाच्या कोपऱ्यात दडून राहते. तू मात्र शिक्षणाकडे लक्ष दे. इतर मुलांसारखं

भरकटून जाऊ नकोस. तू वयाच्या अत्यंत नाजूक फेज मधून जात आहेस. पटकन विश्वास बसणे, पटकन राग येणे असे होते. जीवनात एखादे ध्येय निश्चित कर व त्या ध्येयाला साध्य करण्याचा कसोशीने प्रयत्न कर. जीवनात अनेक अडथळे अनेक मार्गांनी येतात तेथे न अडकता बाजूने वळसा घेऊन पुढील प्रवास करायचा असतो. मी खूप मोठा तत्ववेत्ता म्हणून तुला मार्गदर्शन करत नाही तर तू माझा जीवाचा तुकडा छोटा भाऊ आहेस. मातृभूमीच्या रक्षणासाठी मी जीवन वाहून घेणार आहे. पण आपल्या आईची सेवा तू नक्कीच करशील ही आशा आहे. माझी कमी कधीही आईला भासू देऊ नको. बोलण्याला शब्द उरले नव्हते, घट्ट मिठीत दोन भाऊ सर्व जग विसरले होते, चार डोळयातून अविरत अश्रू वाहत होते.

उत्सुतेपोटी गोपाळ व राकेश रोज पोस्ट ऑफिस मधे स्वतः जाऊन सातारच्या पत्राची चौकशी करत होते. आज मात्र त्यांची निराशा झाली नाही. पोस्ट ऑफिस बाहेर असलेल्या चहाच्या टपरीवर जाऊन त्यांनी दोन कट चहाची ऑर्डर दिली. चहा येई पर्यंत पाकीट उघडून बघितली. दोघांनाही बंगलोरला ३० दिवसाच्या ट्रेनिंग साठी ऑर्डर होती. दोन दिवसात निघायचे होते. आनंदात आकाश्यात उडतच दोघे आपापल्या घरी पोहचले. बातमी गावात पसरायला वेळ लागला नाही. भेटायला येणाऱ्यांची रीघ लागली होती.

राकेशच्या घरासमोर अग्रवाल यांचा वाडा होता. त्यांचे गावात मोठे एकुलते एक किरणा दुकान होते. लहानपणापासून राकेश अग्रवाल काकांना ओळखत होता, त्यांच्या घरी खेळायलापण जात होता. त्यांची मुलगी सुगंधी पण त्यांच्या घरी खेळायला येत होती. पुढे सुगंधी तिच्या मामाकडे शिकायला गेली. राकेश सांगलीला शिक्षणासाठी गेला. त्यामुळे ते आजपर्यंत फारच कमी वेळा एकमेकासमोर आले होते. सकाळपासून मात्र अग्रवाल काकांच्या गच्ची वरून कोणीतरी सारखे आपल्या घराकडे नजर ठेऊन असल्याचा भास राकेशला होत होता. एकीकडे राकेशचे सुटकेस भरण्याचे काम चालू होते. उमेश व आई आठउन आठउन एक एक वस्तू सुटकेस मधे भरत होते. राकेशला आवडणाऱ्या डिंकाच्या लाडूंचा डबा आईने खास न विसरता ठेवला. दुसरा दिवस फक्त आई जवळ बसूनच राकेशने काढला. तू परत लौकर ये. तुझे दोनाचे चार हात करायचे आहेत, मला आता सुनमुख बघायची घाई झाली आहे असा तगदा लावला होता. संध्याकाळीच्या मराठी बातम्या राकेश ऐकत होता. इतक्यात उमेश आला व त्याने बाहेर कोणीतरी बोलवत असल्याचे त्याला सांगितले. उमेशच्या चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह पाहून त्याला काही बोध झाला नाही.

राकेश बाहेर अंगणात आला. चंद्रप्रकाशात अंगण न्हाऊन निघाले होते. कोणीच दिसत नाही पाहून तो गोंधळून गेला. इतक्यात तुळशी वृदावनाच्या बाजूला एक सावली दिसली अंधुकशी पाठमोरी. राकेश जवळ गेला आणी आश्चर्यचकित झाला. एक सुंदर मुलगी हातात गुलाबाचे फुल घेऊन उभी होती. दोघेही एकमेकांकडे पहातच राहिले.

काही क्षणानंतर मुलीनेच विचारले “काय नाही ओळखले ना ? वाटलेच होते. तू आता कसा ओळखशील?”

राकेशने क्षणात ओळखले ती सुगंधा होती. “तू किती मोठी झालीस ग? लहानपणची वेंधळी, सतत नाक पुसणारी सुगंधा कुठे गेली? तू तर तुझ्या मामाकडे शिकायला होतीस ना कधी परत आलीस?”

“अरे हो हो प्रश्नांचा भडीमार करू नकोस. मी मामाकडे तर तू सांगलीला होतास. मी नेहमी सुटीत घरी येत होती. कधी कधी तू पण सांगलीहून घरी येत असे तेव्हा मी तुला आमच्या गॅलरीतून बघत असे, तेव्हाच तू मला आवडायला लागला होतास. मी तुला भेटायचा प्रयत्न करत होते तेवड्यात तू सांगलीला पसार व्हायचा. आज सर्व धीर एकवटून आज तुला भेटायला व एक विनंती करायला आले आहे.”

“बोल ना. माझ्याकडून तुला काय पाहिजे? लहानपणी माझ्याकडून भांडून चॉकलेट,आस्क्रीम मागायचीस, आठवते का?”

दोन क्षण निरव शांतता पसरली. कोणीच बोलत नव्हते. चार डोळेच एकमेकांशी बोलत होते. मूर्तिमंत जशी स्वर्गातून आलेली परीच जणू. गोरीपान काया, निळया अथांग खोल सागरासारखे निळे, आणी भोकरासारखे मोठे डोळे, तरतरीत नाकाचा शेंडा, गुलाबी गाल, नजर लागू नये म्हणून देवाने खास काळजी घेतलेली दिसत होती, उजव्या गालावरचा काला तीळ सौंदर्य वाढवत होता. दोन्ही कानांवर आलेले केसाचे सुंदर वर्तुळाकार बट त्या मूर्तिमंत सौदर्य वतीचे सौंदर्य कितीतरी पटीने वाढवत होते. स्वप्नातून बाहेर पडायला राकेशला काही क्षण लागले. बोलायला शब्द सुचत नव्हते.

दोघेही भानावर आल्यावर खळखळून हसत सुटले. दोन प्रेमी जीवांना हसायला काही कारण लागते का? तेवढ्यात आई हसण्याचा आवाज ऐकून बाहेर आली होती.

“काय ग सुगंधे आत यायचे नाही का? आज तुझ्याशी अंगणात बसून निवांत गप्पा मारायला वेळच नाही बघ. कारण उद्याच राकेश बंगलोरला मिलिटरी ट्रेनिंग साठी निघत आहे, त्याची तयारी चालू आहे.”

राकेश रेडिओचा आवाज कमी करायला गेला होता.

“काकू राकेश तर इंजिनियर आहे मग मिल्ट्रीत का जात आहे? त्याला थांबवत का नाही? इथेच, सांगली, कोल्हापूर किंवा पुण्याला त्याला चांगल्या पगाराची नोकरी मिळू शकते. माझे बाबा व मामा त्याला चांगली नोकरी मिळण्यासाठी प्रयत्न नक्कीच करतील.”

आईने सुगंधाला जवळ घेतले. “अगदी माझ्या मनातले बोललीस बघ.तुझ्या तोंडात साखर पडो. राकेशने एकदा निर्णय घेतला की आपण कितीही सांगितले तरी तो बदलत नाही.”

आई ने पटकन चहा ठेवला होता. राकेशला व उमेशला बोलावून सर्वांनी चहा घेतला. सुगंधा आईला म्हणाली काकू येते, पण राकेशला आमच्या घरापर्यंत सोडायला सांगता का? कारण मला संध्याकाळची कुत्र्यांची खूप भीती वाटते.

तसेच झाले. राकेश सुगंधाला तिच्या घरा पर्यंत सोडायला निघाला. सुगंधा तुझ्या हुशारीचे कौतुकच करावे लागेल. आईला काय पण थाप मारलीस, कुत्र्यांची भीती वाटले का? मग तू येतांना कुत्रे वाटेत नव्हते का? काही क्षण शांतता पसरली. अबोलपणे पावले उचलली जात होती. चंद्रप्रकाशात परिसर उजळला होता. अचानक सुगंधाच्या अंगठ्याला एका दगडाची ठेच लागली. पटकन राकेशने तिला सावरले. खिशातून रुमाल काढून रक्त येत असलेल्या अंगठ्याला बांधला. सुगंधा अबोल झाली होती. दोन्ही डोळयात अश्रू तरळट होते.

“अजूनही लहानपणी सारखी वेंधळी आहेस का?”

उत्तर नाही आले. फक्त एक हुंकार आला.

“वेड्या मला रडू अंगठ्याला ठेच लागली म्हणून नाही आले, मी तुझ्यावर खूप प्रेम करते आजवर ते अव्यक्त होते आज तुझ्याजवळ मन मोकळे करत आहे. वाईट याचे वाटते की तू मिल्ट्रीत भरती होण्याचा निर्णय घेतला आहेस. माझ्यापासून दूर जाणार आहेस. मला दुरावा सहन होणार नाही. आपण लग्न करू. मी बाबांना सांगेन, आईची समजूत काढू. तू इथेच नोकरी बघ. पण तुझा निर्णय बदल.”

"सुगंधा तुला कसे समजावून सांगू. कितीतरी दिवसांनी आज तुला अचानक बघीतले आणी मी तुझ्या प्रेमात पडलो. मी नक्कीच मूर्ख होतो की तुझे प्रेम आजवर समजू शकलो नाही. माझे नक्कीच मोठे भाग्य की तू मला तुझा जीवनसाथी निवडले त्याबद्दल मी तुझा आभारी आहे. पण आता वेळ गेली आहे. मी तुला खोटे स्वप्न दाखवणार नाही. माझा सैन्यात भरती होण्याचा निर्णय पक्का आहे. आजवरचा इतिहास आहे दोन प्रेमी जीवांच्या प्रेमाचा शेवट क्वचितच लग्नात होतो. मी तुझ्या प्रेमाचा नक्कीच आदर करतो. माझ्या पेक्षा जास्त प्रेम करणारा तरुण तुला नक्कीच मिळेल तो माझ्या पेक्षा नक्कीच भाग्यवान असेल."

बोलतांना राकेशचे डोळे भरून आले होते. न मागता देव राकेशच्या ओंजळीत भरभरून सुख देण्यास तयार होता पण राकेश स्वतःला कमनशिबी समजत होता. सुगंधाचे घर जवळ आले, तसे पावले अजून स्लो झाली.

अचानक सुगंधा राकेशला आडवी झाली. "बस आता तू मला उपदेश देणे बंद कर. मी मनाने कधीच तुझी झाली आहे. तुला नाही कळणार, कोणत्याही मुलींच्या मनात एकदा उमटलेली प्रेमाची प्रतिमा कधीच पुसली जात नाही. तू आनंदाने सैन्यात जा, मी तुला आडवणार नाही, पण मी मात्र फक्त तुझी अन तुझीच असेन, तुझी वाट पहात असेन कायमची. मला खात्री आहे तू पण मला कधीच विसरू शकणार नाहीस. इतिहासाचा दाखला तू देऊ नकोस, तो काही नियम होत नाही आणी असलाच तर प्रत्येक नियमाला अपवाद असतोच ना? मग आपण प्रेमाचे रुपांतर लग्नात करून जगाला दाखउ व इथून पुढे आपले उदाहरण सगळे प्रेमी सर्व जगाला नेहमी देतील की दोन प्रेमी जीवांचे लग्न लगेच झाले नाही तरी जीवनाच्या अंतापर्यंत ते एकमेकांची वाट पाहू शकतात."

तेवढ्यात समोरून सुगंधाचे बाबा येतांना दिसले. दोघेही गप्प झाले. अबोल पणे पण बोलक्या डोळयांनी एकमेकांचा निरोप घेतला.

त्या रात्री दोघांनाही झोप लागली नाही. कल्पनेच्या स्वर्गात दोघेही रममाण झाली होती. सकाळी गोपालने अंगावरची चादर ओढली तेव्हा राकेशला जाग आली. आज दुपारी ३

वाजता बसने पुण्याला व नंतर ट्रेन ने बंगलोरला जायचे होते. सगळी तयारी झाली होती. उमेशने बस स्टेशन पर्यंत जाण्यासाठी रिक्षा पण सांगितली होती. दुपारच्या जेवणाला गोपालला थांबउन घेतले होते. दुपारी २ वाजता सगळ्यांचा चहा झाला. गोपालने बरोबर सुटकेस आणली होतीच. दोघांनी कपडे केले. देवाला, आईला व बाबांच्या फोटोला नमस्कार केला. जवळ उभ्या असलेल्या जोशीकाकांना पण नमस्कार केला. राकेशने उमेशला जवळ घेऊन घट्ट मिठी मारली. आई सांगेल तसे वागायचे प्रोमीस घेतले. इतक्यात सुगंधा दरवाज्यातून आत आली. तिच्या हातात दोन पार्सल होते. तिने सांगितले की राकेश आता आपल्या मातुभूमिच्या सेवे साठी सीमेवर जात आहे म्हणून त्याला बाबांनी सीम कार्ड सहित मोबाईल भेट दिला आहे.

“आणी ते दुसरे पार्सल कोणासठी ग आणलेस?” आईने विचारले.

तिने धीट पणे सांगितले “राकेशला फोन करायला कधी वेळ मिळेल न मिळेल. पण आई व उमेशला कधी त्याची आठवण आली बोलावसे वाटले तर या दुसऱ्या फोन वरून ते संपर्क करू शकतात, त्यात पण सीम कार्ड आहे.”

“अग मुली एवढा खर्च कशाला केला तुझ्या बाबांनी” आईने न राहून विचारले.

“अहो काकू माझ्या मामाचे मोबाईलचे दुकान आहे. तो दरवर्षी नवीन मोबाईल बाबांना गिफ्ट देत असतो. घरात खूप नवीन मोबाईल साठले आहेत. तुम्ही काळजी करू नका.”

राकेशने नजरेनेच तिचे आभार मानले. गोपाळ व उमेशच्या चेहऱ्यावर गुढ हास्य होते. मोठ्या खूबीने सुगंधीने राकेशला मोबाईल गिफ्ट देण्यात यश मिळवले होते.

बंगलोरचा प्रवास सुरु झाला होता. पुण्याला पोहचल्यावर ट्रेन मधे स्पेशल बोगी व बर्थ दोघांसाठी रिझर्व होते. वरचा बर्थ मिळाल्याने राकेशने निवांत श्वास घेतला. डोळ्यापुढून सुगंधाची प्रतिमा जात नव्हती. दोन भोकरासारखे निळे डोळे सारखे राकेशकडे बघत होते. कानांच्या पुढे डोकावणाऱ्या केसांच्या बटा मधे राकेश हरवून गेला होता. कधी झोप लागली कळलेच नाही. गोपाळला मात्र भविष्याच्या काळजीने बराच वेळ झोप लागली नव्हती. गोपाळला जाग आली तेव्हा बंगलोर रेल्वे स्टेशन वर ट्रेन थांबत होती. गोपाळने पटकन राकेशला उठवले. दोघांनी पटकन शूज घातले, सामान घेऊन स्टेशन बाहेर आले व मिलिटरी ट्रेनिंग सेंटर वर जाण्यासाठी टैक्सी हायर केली.

बंगलोरचे ट्रेनिंग सेंटर खूप विस्तारले होते. ट्रेनिंगला आलेल्या जवानांसाठी सुरेख,सुसज्ज असे रेसिडेनशियल कोम्प्लेक्स होते. जॉइनिंग रेपोर्ट दिल्यावर त्या दोघांनी फक्त ट्रेनिंग विषयी माहिती गोळा केली व आराम केला. या सेंटर मधे बैफल फायरिग रेंज, ॲथलेटिक ट्रेक होता. ५० एकर जागे मधे कमांडो ऐबस्टकल (अडथळे) कोर्से होता. खड्डे, पाणी, उंच भिंत, तारांचे वेटोळे असे ३१ अडथळे ओलांडण्याचे खडतर प्रशिक्षण जवानांना घ्यावे लागे. तसेच भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक, लांबउडी, बांबूउडी याचे प्रशिक्षण दिले जाते. ट्रकच्या मध्यभागी फुटबॉल व हॉकीचे मैदान होते. सकाळी शार्प ५ वाजता ग्राउंडवर रिपोर्टिंग होते.

४ वाजता मोबाईलचा गजर झाला. राकेशने मनापासून सुगंधाने मोबाईल भेट दिला म्हणून आभार मानले. आल्यापासून इच्छा असूनसुद्धा सुगंधाला फोन करणे जमले नव्हते. वेळात वेळ काढून तिला फोन करण्याचे मनापासून ठरवले. दोघांनी पटकन आवरून ग्राउंडवर हजेरी लावली. लगेच ५ राउंड रनिंग करावे लागले. तसा नियमच होता. त्या नंतर सामुहिक कवायत होती. त्या नंतर एका मोठ्या हॉल मधे सगळयांसाठी ब्रेकफास्ट होता. त्यानंतर फायरिग रॉउंड असायचे. एके-४७ पेक्षा अत्याधुनिक अशा रायफल्सचे मेनटेनंस, लोडिंग, टार्गेट अचिविन्ग शिकावे लागे. दुपारी एक वाजता लंच असे.

एक तासाच्या विश्रांती नंतर हॉलमध्ये विविध विषयावर मिलिटरी ऑफिसर्स चे लेक्चर असे. त्यानंतर अर्धा तासाचा टी टाईम असे. दुपारी चार वाजता अडथळे शर्यतीचा सराव करावा लागे. संध्याकाळी ६ वाजता त्या दिवसाचे ट्रेनिंग संपलेले असे. रात्री ८ ते ९ या वेळेतच फक्त बुफे डिनर मिळे. दुसऱ्या दिवशी परत पहाटे चार वाजता दिवस सुरु होत असे.

पहिल्या चारदिवसात लक्षात असूनसुद्धा राकेशला सुगंधाला फोन करणे जमले नाही. उमेशला मात्र त्याने मेसेज करून सुखरूप पोचल्याचे कळवले होते. रविवारी फक्त लेक्चर होते. दुपारी चार वाजता सुटी झाल्यावर गोपाळ व राकेश रूमवर आले. त्याने लगेच सुगंधाला फोन लावला. रिंग वाजतच राहिली. वैतागून त्याने मोबाईल चार्जिंगला लावला व बेड वर पडला. त्याचा डोळा लागून गेला. अर्धा तास झाला असेल फोनच्या रिंग ने त्याला जाग आली. बघतो तर काय सुगंधाचा फोन होता. त्याने बराच वेळ हॉलो हॉलो केले पण तीकडून रिप्लाय येत नव्हता. तो बंद करणार एवढ्यात हॉलो अगदी हळू कोमल आवाज आला. कोणीतरी नाराज माणसाचा

फोन दिसत आहे. असे म्हणताच तीकडून मोठा आवाज आला. नाराज कोण आहे मी का तू? तीकडून सुगंधाचा मिश्कील आवाज आला. तुला बंगलोरला जाऊन किती दिवस झाले एकदा तरी माझी आठवण आली का? आठवण आली असती तर तू मला फोन केला नसता का? एकतर खूप वर्ष मनात साठलेले प्रेम परिणामांची पर्वा न करता मी तुझ्याजवळ व्यक्त केले. मी बरोबर केले कि नाही मला माहित नाही. तुझा रीस्पॉंस कसा आहे हे मला कळालेच नाही. तू दिलेल्या उत्तराने मी काहीसी नाराज झाली होती. म्हणून मी स्वतः तुला फोन न करता तुझ्या फोनची वाट पहात होते. जसे चार दिवस उलटून गेले तसे तुझा नकार असावा असे मला वाटले. तुझा फोन आला तेव्हा मी आणि बाबा दुकानात आलेल्या सामानाची लिस्ट चेक करत होतो. बाबांनी मला सांगितले तुझ्या मोबाईलची रिंग वाजते आहे बघ कोणाचा फोन आहे. मी बाबांना सांगितले की कुठल्यातरी कंपनीचा फोन आहे जाऊ द्या वाजू द्या. ते कौंटरवर गेल्यावर मी तुला फोन केला. तू गेल्या नंतर कितीतरी रात्री मी आढ्याकडे बघत काढल्या, झोपच येत नाही काय करू.?

सॉरी, मी बंगलोरला आल्यानंतर लगेच तुला फोन करायला पाहिजे होता. पण लगेचच ट्रेनिंगच्या बिझी शेड्यूल मधे अडकलो. रात्री ९ वाजे नंतर निवांत असायचो पण रात्री तुला फोन कसा करणार ना? बर जाऊ दे. मी गावी आल्यावर आपण जरूर वाद करत बसू . तू दिलेल्या मोबाईलबद्दल मनापासून धन्यवाद. तुझा फोन झाल्यावर मी उमेश व आईशी पण बोलणार आहे. बंगलोरचे ३० दिवसांचे खडतर एन्ट्री ट्रेनिंग आहे. ट्रेनिंग चालू असताना मी व गोपाळ पण एकमेकांशी बोलू शकत नाही. थोडी चूक झाली तरी कठोर पनिशमेंट होते. मी गावाला आलो की आपण भेटूच तो पर्यंत अधीर होऊ नकोस. दर रविवारी ४ वाजता फोन करीत जाईन. तोपर्यंत जमले तर माझ्या आईची काळजी घे, उमेशला करीयर कडे लक्ष द्यायला सांग. आता फोन ठेवतोय कारण गोपाळ आला आहे, तो पर्यंत स्वप्नात मात्र रोज नक्कीच भेटू.

आता ट्रेनिंग चे शेवटचे तीन दिवस बाकी होते. सगळया जवानांमध्ये प्रचंड कॉन्फिडन्स वाढला होता. भारतातल्या वेगवेगळया प्रांतातून जवान आलेले होते. भाषा, राहणीमान, जेवणाच्या पद्धती, सणवार सगळे वेगवेगळे होते. सगळयामधे एकच कॉमन होते ते म्हणजे मातृभूमी वर असलेले निस्सीम प्रेम, वेळ आली तर मातृभूमीच्या रक्षणासाठी जीव देण्याची तयारी व कुठल्याही प्रकारच्या त्यागाची तयारी. ज्याची कमतरता आजकाल बहुसंख्य तरुणांमधे दिसून येते. डिग्री मिळाल्यावर कमीतकमी श्रमात, वेळेत, जास्तीत जास्त पैसे कसे मिळतील याकडे आकर्षण दिसते. दुर्दैव आहे की शिक्षण पूर्ण झाली की नाईलाजाने नोकरी शोधण्याला

प्राधान्य द्यावे लागते. नंतरचे प्राधान्य असते लग्न. मग आणा मागे लागतो. मुल होतात, त्यांचे शिक्षण, त्यांचे लग्न यात निम्मे जीवन संपलेले असते. या सगळयांनी सुरक्षित सुखी सामान्य जीवन जगावे म्हणून आमच्या सारखे देशला वाहून घेतलेले जवान सीमेवर रात्रीचा दिवस करून, जीवाचे रान करून शत्रू पासून मातृभूमीचे,पर्यायाने सगळयांचे रक्षण करत असतो.

शेवटच्या दिवशी कौन्सिलिंग घेण्यात आले. सैन्यात भरती होण्याचा निर्णय कसा योग्य आहे, तुमच्या सारख्या जवानांची आज देशला किती गरज आहे याचे महत्व सांगितले गेले. पंजाबच्या जस्बीरसिंग ला प्रथम तर राकेशला

द्वितीय बेस्ट कमांडो चे पदक देऊन गौरव केला गेला. इजीनियरिंगची डिग्री मिळाल्या मुळे ट्रेनिंग नंतर पहिली पोस्टिंग कमिश्नड ऑफिसर केडर मधील लेफ्टनंट म्हणून असेल, पुढचे प्रमोशन कॅप्टन, मेजर असे असेल. संध्याकाळी सर्व जवान बंगलोर सिटी बघायला गेले. परतीचे सगळयांचे रेल्वे रिझर्वेशन केले होते. सगळयांच्या गळा भेट झाल्या. एकमेकांचे मोबाईल नंबर शेअर केले गेले.

गोपाळ व राकेश ३० दिवसांचे बंगलोरचे ट्रेनिंग पूर्ण करून परत गावी आले. पुढच्या ट्रेनिंगसाठी फक्त आठ दिवस होते. दोघांच्याही जीवनातील हा मोठा टर्निंग पॉइंट होता. शरीर पिळदार झाले होते. चालण्या, बोलण्यात, उठण्या बसण्यात आत्मविश्वास ठासून भरलेला दिसत होता. वागण्यात शिस्त होती. नजरेत जरब होती. घरी जास्तीत जास्त वेळ उमेश व आई जवळ काढायचे राकेशने ठरवले. आईला व उमेशला खूपच आनंद झाला होता. ट्रेनिंग बद्दल सविस्तर जाणून घेण्याची दोघांची इच्छा राकेशने पूर्ण केली. त्या वेळी सुगंधा हळूच आई शेजारी येऊन बसली होती. ऐकतांना सगळे भाराऊन गेले होते. ट्रेनिंग किती कठीण खडतर होते याची कल्पना सगळयांना आली.

दोन दिवसानंतर सुगंधाने राकेशला गाठलेच. आतातरी तुझ्याजवळ वेळ आहे का माझ्याशी बोलायला ? सुगंधाने सुरवात केली. चल आपण नदी किनारी असलेल्या आंब्याच्या झाडाखाली बसू. चालत ते कधी पोहचले कळलेच नाही. सन्ध्याकाळ होत होती. सूर्य पश्चिमेकडे

झुकत होता. पाखरे परत घरट्याकडे येत होती. दोन प्रेमी जीव सर्व जगाला विसरून एकमेकांच्या मिठीत होते. राकेशला भान आले. सैन्यात आपण भरती झाले आहोत या सत्याची जाणीव झाली. आपण सुगंधाला सत्याची जाणीव करून दयायला पाहिजे असे राकेशने मनोमन ठरवले. सुगंधा तू मला खूप आवडतेस, माझे तुझ्यावर स्वताःपेक्षा जास्त प्रेम आहे. तू मला तुझा जीवनसाथी निवडले हे माझे भाग्य आहे. तरीपण मी तुला मनापासून विनंती करीन की तू तुझ्या तोलामोलाचा दुसरा जीवनसाथी निवडून सुखी जीवन जग. तू सुखी असल्यास मला सीमेवर लढतांना दहा हत्तीचे बळ येईल. सैनिकाच्या डोक्यावर कायमची टांगती तलवार असते. मला मिळवण्यासाठी तू तुझ्या स्वप्नांना बळी देऊ नकोस. माझे मन दोलायमान होईल असे तू काहीही करणार नाहीस ही खात्री आहे.

वैतागून सुगंधाने जवळ पडलेला दगड उचलला व नदीच्या पात्रात जोरात भिरकावला. वातावरण गंभीर झाल्याचे राकेशच्या लक्षात आले. माझेच चुकले तुझ्यावर प्रेम करून. सैन्यातील अधिकारी खूप कठोर असतात ऐकले होते पण त्यांचे काळीज पण दगडाचे असते हे आज मला समजले. सुगंधाने मन मोकळं करायला सुरवात केली. तुझं कॉलेजमधील कुठल्या मुलीवर प्रेम आहे का? म्हणून तू मला असा टाकून बोलत आहेस? तसे असेल तर मला सांग मी तुझ्या जीवनातून निघून जाईन. प्रेम असे ठरवून करता येत नाही राकेश. ते निसर्गताहा उपजत असते. तसेच इथून पुढे प्रेम करायचे नाही, असलेले प्रेम विसरून जायचे हे इतके सोपे नाही, कोणाच्याही हातात नाही. असा कुठलाही बाजार या जगात नाही जेथे प्रेमाची काही अटींवर देवाणघेवाण होत असेल. मनातील एक कप्पा एकदा दिला गेला की तो रिप्लेस करून दुसऱ्याला देऊ शकत नाही, तो कायमचा रिकामाच राहतो. तडजोडीने चाललेले अनेक संसार असतात. मोडत पण नाही पण लडखडत नाईलाजने निभवत असतात, पण मला कुठलीही तडजोड करून, मन मारून जगायचे नाही. मी तुझ्यावर प्रेम करते, करते म्हणजे करते. तुझे नसले तरी करत राहणार हे त्रिकाल सत्य आहे. मला उपदेश देऊन माझे मन विचलित होईल असे तुला वाटत असेल तर तू चुकत आहेस.

असो आता ऐक. तू माझा आहेस यापुढेही कायमच माझाच राहशील. मी तुझ्या ध्येयाच्या आड कधीही येणार नाही. तू आनंदाने, पूर्ण आत्मविश्वासाने सीमेवर शत्रूशी लढ, मी कायम तुझ्या सोबत असनार नाही पण तुझ्या हृदयात कायमची असेल. मी कधीही दुसऱ्या कोणाची असणार नाही याची खात्री बाळग. वेळ आल्यास मी तुझ्या फक्त नावाने पूर्ण जीवन

तुझ्या आठवणींवर काढीन पण परत मी दुसऱ्या अनोळखी व्यक्तीशी लग्न करावे असा अनाहूत सल्ला तुझा ओठांवर परत येणार नाही अशी शपथ घे.

सुगंधाला समजावणे राकेशला शक्य नव्हते. प्रेमाची ताकद काय असते याचे प्रत्यंतर राकेशला जाणवत होते. राकेशपुढे पर्याय नव्हता. राकेशने सुगंधाला मिठीत घेतले. आभाळ स्वच्छ झाले होते. मनोमिलन तर झालेच होते पण प्रेमाचे रुपांतर बळकट विश्वासात झाले होते. आता माघार नव्हती. फक्त भविष्यात काय लिहून ठेवले आहे या बद्दल दोघेही अनभिज्ञ होते.

दुसऱ्या दिवशी टेलीग्राम आला. सिकंदराबाद येथील इलेट्रीकल आणि मेक्यानिकल ईजनियरिंग संस्थेत पुढच्या ट्रेनिंग साठी जायचे होते. सगळयांचा निरोप घेऊन गोपाळ व राकेश सिकंदराबादला जायला निघाले. ट्रेन सिकंदराबाद कडे धावत होती पण राकेशचे मन गावीच सुगंधा जवळ घुटमळत होते. आपल्याला कोणीतरी आवडते यापेक्षा कुणालातरी आपण आवडतो ही कल्पना फारच सुखकारक होती. दोघांचेही जीवनसाथी बनण्याचे स्वप्न मात्र नियतीच्या हाती होते. सुगंधाने निघतांना राकेशला सांगितले की डिग्री मिळाल्यावर ती पुण्याच्या मामाकडे जाऊन नर्सिंग चा कोर्स करणार आहे. गोपाळला राकेशच्या मनस्थितीची कल्पना होती. त्याने प्रवासाचा आनंद लुटला. सिकंदराबादला पोचल्यावर दोघांनी ट्रेनिंग सेंटर गाठले.

या ट्रेनिंग मधे बंगलोर सारख्या रुटीन व्यायाम, खेळ, फायरिंग सराव, होतेच पण महत्वाचे इंजिनियरिंग विषयाचा सखोल अभ्यास होता. सीमेवर लढतांना इंजिनियरिंग विषयाचे ज्ञान फार महत्वाचे असते. त्याची सविस्तर माहिती देशाच्या सुरक्षेच्या कारणास्तव उघड न करण्याचे बंधनकारक होते.

ट्रेनिंग चे विषय अतिशय गुप्त होते. सिकंदराबादच्या ट्रेनिंगला तीन दिवसांनी ३० दिवस पूर्ण होणार होते. त्यावेळी अचानक ऑर्डर मिळाली की हे ट्रेनिंग संपल्यावर लगेच पुणे येथे कॉलेज ऑफ मिलिटरी इंजनिग्रिंग येथे १५ दिवसांचे ट्रेनिंग होते. घरी जायला मधे वेळ मिळणार नव्हता. गोपाळ व राकेश दोघेही नाराज झाले होते, पण नाईलाज होता. राकेशने उमेशला फोन करून तसे कळवले. आईशी पण बोलणे झाले. फक्त सुगंधाला फोन लागला नाही. जसजसे ट्रेनिंग

पूर्ण होत होते तसे फिजिकल फिटनेस तर जाणवतच होता पण अनेक माहित नसलेल्या विषयांच्या ज्ञानात भर पडली होती. सीमेवर जाऊन लढण्याचा आत्मविश्वास वाढला होता.

पुण्याचे १५ दिवसांचे ट्रेनिंग लौकरच संपले. पुणे शहर राकेशला खूप आवडले. जगलो वाचलो तर निवृत्त झाल्यावर पुण्याला स्थाईक होण्याचा विचार त्याने केला. कधी एकदा घरी जाऊन आई व उमेशला भेटतो असे त्याला झाले होते. घरी पोहचल्यावर सगळयांना आनंद झाला. राकेश आता खूप रुबाबदार दिसत होता. संध्याकाळी जोशीकाका व गावातील काही मंडळी राकेशच्या घरी जमली. गोपाळला पण बोलावून घेण्यात आले. गावकऱ्यांनी भारतीय सैन्यात भरती झाल्याबद्दल दोघांचा सत्कार केला. सैन्यात भरती होणे म्हणजे येऱ्यागबाळयाचे काम नाही त्यासाठी जिगर लागते, आपल्या आवडीनिवडी, भौतिक सुखाच्या इच्छांना मूठमाती द्यावी लागते, मातृभूमीबद्दल प्रेम, वेळ आली तर बलिदान द्यायची तयारी असावी लागते, जोशीकाकांनी आपल्या छोट्याशा भाषणात सांगितले. दोघांबद्दल गावकऱ्यांना कायम गर्व वाटेल असे अग्रवाल काकांनी सांगितले. रात्री राकेशने सुगंधाला फोन केला होता. ती आठ दिवसापूर्वी पुण्याला मामाकडे गेली होती. सरकारी नर्सिंग कोर्सला तिला अडमिशन मिळाली होती. ही आनंदाची बातमी सांगण्यासाठी राकेशला कॉल करण्याचा तिने खूप प्रयत्न केला होता पण फोन बंद लागत होता. फोन लागल्यावर ट्रेनिंग पूर्ण झाल्या बद्दल सुगंधाने राकेशचे अभिनंदन केले. पोस्टींग कुठे होते याची वाट पहात असल्याचे राकेशने सांगितले. पोस्टींग च्या जागेवर रुजू होण्याआधी पुण्याला येऊन भेटेन असे प्रोमीस राकेशने सुगंधाला दिले.

पहिलीच पोस्टींग राजस्थान मधील पोखरण येथे मिळाली. गोपाळला मात्र आसामला पोस्टींग मिळाली होती. दोन जिवलग मित्र आता एकमेकांपासून दूर होणार होते. गोपाळला रडू आवरेना. लहानपणापासून एका शाळेत, नंतर एकाच कॉलेजला, सैन्य भरतीत, ट्रेनिंगलापण एकत्र, पोस्टींग मात्र दोन टोकांना. राकेशला पण दु:ख आवरत नव्हते. दोघेही नदीवर गेले, तीन तास अविरत पोहल्यावर शांत झाले. आपल्या इतकी दीर्घकाळ कोणी मैत्री निभउ शकणार नाही याची त्यांना खात्री होती. आपण कितीही दूर असलो तरी मोबाईल मुळे नेहमीच एकमेकांच्या संपर्कात असू असे एकमेकांना समजावत होते. दोघांनी एकमेकांचा आनंदाने निरोप घ्यायचा असे ठरवले.

सगळयांचा निरोप घेऊन गोपाळ आसामला व राकेश जयपूर राजस्थान कडे निघाले. थोडासा उलटा प्रवास करून राकेश आधी पुण्याला सुगंधाला भेटायला गेला. होस्टेल वरून अर्ध्या तासाची परवानगी घेऊन सुगंधा व राकेश जवळ असलेल्या गार्डन मधे गेले. एका बाकावर बसले. सुगंधाने मिठी मारून लगेच रडायला सुरवात केली. राकेशने तिला थांबवले नाही. मन मोकळे होणे जरुरी होते. त्याने हळूच बोलायला सुरवात केली. वेडे, मला हसून निरोप देणार आहेस की रडून? आपण फक्त शरीराने दूर असू मन,हृद्य मात्र एकमेकांजवळच असेल. आपण कायम संपर्कात असू नुसत्या मोबाईल मुळेच नाही तर टेलीपथी मुळे. या बद्दल तुला माहिती नसल्यास या विषयाची पुस्तक मोकळया वेळेत वाच. कितीही प्रचंड मोठे अंतर असले तरी टेलीपथीच्या मदतीने दोन व्यक्ती संपर्कात राहू शकतात याची मला खात्री आहे. असो. तुझ्या नर्सिंगच्या कोर्सला माझ्या शुभेच्छा. जेव्हाजेव्हा गावी जाशील माझी विनंती आहे की आई व उमेशला भेटत जा. सुगंधा रागाने दूर जाऊन उभी राहिली. राकेश तू मला वेडी समजतोस का रे ? मी तुला आपले मानले म्हणजे आई, उमेश माझे कुणीच लागत नाही का? तू अजिबात काळजी करू नकोस. तू अजिबात गावाकडची कुठलीच काळजी करायची नाही, सगळी जबाबदारी मी घेतली आहे. तू फक्त मातृभूमीच्या रक्षणाची जबाबदारी निभव. मन दोलायमान होईल त्यावेळी माझी फक्त आठवण काढ आणी शत्रूवर तुटून पड. तुझ्या सारखे शूर वीर मातृभूमीच्या पोटी आहेत तो पर्यंत काय बिशाद भारताकडे कोणीही वाईट नजरेने बघायची.

परत दोन अबोल जीव एकमेकांच्या मिठीत विरघळून गेले कळलेच नाही.

जास्त वेळ होस्टेल च्या बाहेर राहणे शक्य नसल्याने दोघांनी एकमेकांचा हसून आनंदाने निरोप घेतला. मनाने पुण्याला पण शरीराने राकेश जयपूरला निघाला. जयपूरला पोहचला तेव्हा रात्रीचे २ वाजले होते. युनिफोर्म घातलेले दोन जवान त्याला घ्यायला स्टेशनवर आले होते. बोलणे काही झाले नाही, त्यांनी नाव विचारले, व आयकार्ड बघीतले. बाहेर असलेल्या मिलिटरी जीप मधे बसून त्याचा प्रवास सुरु झाला. किती तास उलटले समजले नाही, जीप एका टेंट जवळ थांबल्यावर राकेशने डोळे उघडले. एक एकरच्या रेडीयस मधे अनेक मिलिटरी टेंट होते. सगळीकडे युनिफोर्म घातलेल्या जवानांची वर्दळ होती. एका लाईने मधे अनेक मिलिटरी जीप रांगेत उभ्या होत्या. दोन जवान त्याला एका टेंट मधे घेऊन गेले. आत मोठ्या टेबल जवळ रेव्हालिंग चेअर मधे एक उमदा अधिकारी बसला होता. वेल कम, लेफ्टनंट राकेश सर, मै

संतोखसिंग असीस्तंट लेफ्टनंट आपका स्वागत करता है. सर मै मराठी बोल सकता है क्योकी मै मुंबईका-थानेका रहनेवाला है. आज तुम्ही प्रवास करून थकले असाल आता जेवण करून आराम करा. हे तुमचेच ऑफिस आहे. हा टेबल चेअर तुमचीच आहे. सकाळी बरोबर ७ वाजता मी तुम्हाला रिपोर्ट करीन. गुड नाईट सर.

लेफ्टनंटच्या युनिफोर्म मधे राकेश खूपच रुबाबदार दिसत होता. शार्प ७ वाजता तो आपल्या टेंट मधे दाखल झाला. अनुभव नसला तरी आत्मविश्वासाने सर्व जबाबदारीचे काम पार पाडायचा निर्धार त्याने केला. असीस्तंट लेफ्टनंट संतोखसिंग ने उत्साहात एन्ट्री केली. सर बाहेर मिलिटरी जीप उभी आहे त्यात दोन जवान आहेत, त्यापैकी एक जीप ड्राईव्ह करेल. दुसरा आपल्याला कव्हर करेल. जीपमध्ये महत्वाचे अनिमिशेन आहेत. जीप थांबली की ते लेफ्टनंट उमरला हंडओव्हर करून याच जीप मधून परत यायचे आहे. राकेश थोडा गोंधळून गेला होता. साहबजी एक विचारू का? राकेशने विचारले. हे काम तर कोणताही जवान करू शकतो मग मला या कामासाठी का निवडण्यात आले समजेल का? नाही साहबजी ही आपली पहिली परीक्षा समजा. आपण जे काम करत आहोत ते भारत सरकारचे एक सिक्रेट मिशन आहे. कर्नल साहेबांची ऑर्डर आहे की दिलेले काम कुठलेही प्रश्न न विचारता करायचे आहे. एकमेकांशी सुद्धा वाच्चता करायची नाही. मला सुद्धा काहीही माहिती नाही. कृपया परत या कामगिरीबद्दल कुणालाही काहीही प्रश्न विचारू नका अशी माझी नम्र विनंती आहे.

पुढच्याच आठवड्यात राकेशच्या कामात थोडा बदल झाला. तीन जीप बरोबर सहा जवान घेऊन राकेश अद्यात स्थळी जाण्यास निघाला. साधारण ३ तास ४० मिनिट प्रवास झाला. तिन्ही जीप बाजूला लावण्यात आल्या. आज कोणीही युनिफोर्म घातलेले नव्हते. पुढचा प्रवास पायीच होता. साधारण दोन किलोमीटर चालल्यावर खूप मोठा उतार सुरु झाला. उताराचा शेवट एका बोगद्यात झाला. सात फुट उंच, पाच फुट रुंद असा बोगदा होता. दर ४०० मीटरवर एक जवान रायफल घेऊन उभा होता. राकेश जवळ आला की त्याला कडक सॅल्युट केला जात होता.

परत अजून एक तास चालावे लागले आणी राकेशला आश्चर्याचा धक्काच बसला. खूप मोठ्या प्रयोग शाळेत त्याचा प्रवेश झाला होता. बरोबर आलेले जवान आता कोणीच त्याच्या बरोबर नव्हते. त्यांचे काम झाले असावे.

राकेशचे स्वागत लेफ्टनंट शर्मा यांनी केले. वेलकम सर. बी कम्फर्टेबल. इथून पुढे तुम्हाला इथेच काम करायचे आहे, तुमच्या निवासाची व्यवस्था इथेच केली आहे. पुढची ऑर्डर मिळेपर्यंत तुमचा मुक्काम येथेच असेल. तुमची कुठलीही गैरसोय होणार नाही याची पूर्ण काळजी घेण्यात आली आहे. आतमधे टोटल ९ केबिन आहेत. त्यात वेगवेगळे सायंस्टीट त्यांच्या कामात मग्न असतील. तुमचे टेबल खुर्ची बाहेर मध्यभागी असेल. इथे कोणालाच नाव नसते. कोणालाही काही मदत लागल्यास तत्काळ तुम्हाला करावी लागेल. तुमच्या इंजनियरच्या ज्ञानाचा इथे कस लागेल.

पुढचे १० महिने ७ दिवस राकेश तिथे कामात मग्न होता. काहीही अंदाज येत नव्हता. मोबाईल जवळ ठेवण्याची परवानगी नव्हती. घरच्या कोणाशीही संपर्क नव्हता. आईची, उमेशची खूप आठवण येत होती. रोज रात्री दोन निळे भोकरे डोळे आणी कानावरच्या दोन बटा मधे राकेश हरवून जात होता. अचानक एके दिवशी ऑर्डर मिळाली तातडीने काश्मीर मधील कुपवाडा येथे रिपोर्ट करायचे होते. असे का असा प्रश्नच नव्हता. ऑर्डर फालो करायची ही शिस्तच होती. तिसऱ्या दिवशी राकेश ७ जवानांसह काश्मीरमधील कुपवाडा येथे हजर झाला. त्याच्या अंडर १७ कमांडो होते. सीमारेषेवर नाईट पेट्रोलिंग चे काम चलू झाले.

१५ दिवसांनी एक मोठी न्यूज आली. भारताने राजस्थान मधील पोखरण येथे यशस्वी अणु चाचणी केली. सगळया जगाला या बातमीने धक्का बसला. भारत एक अणुशक्तीयुक्त शक्तिशाली देश म्हणून जगापुढे आला. कोणाच्याही दबावाला भारत भिक घालत नाही हे सिद्ध केले. या टॉप सिक्रेट मिशनचा आपण एक छोटासा पार्ट होतो हे राकेश कोणालाच सांगू शकत नव्हता पण त्याचे उर अभिमानाने भरून आले.

कुपवाडा येथे शत्रूबरोबर कायम चकमकी चालू असायच्या. सीमारेषा ओलांडून घुसखोरी करणाऱ्यांवर भारतीय जवानांचे नियत्रण होते. रात्रीचा दिवस करून नियंत्रण रेषेवर पेट्रोलिंग करणे जिकीरीचे काम होते. एक दिवस दुपारी वेळ काढून राकेशने आईला व उमेशला

फोन केला. राकेश पोखरणला होता तेव्हा काहीच संपर्क न झाल्याने आई काळजीत होती. उमेशला नेट कुस्तीत करीयर करायचे होते. त्यासाठी त्याने कोल्हापूरला एक जिम लावली होती. तुम्ही मला फोन करत जाऊ नका, मला वेळ मिळाला की मीच फोन करीत जाईन असे सांगितले. उमेशकडून सुगंधाची माहिती काढून घेतली. ती पुण्यालाच असते, फक्त सुटीमध्ये गावी येत असते असे त्याने सांगितले.

लगेच त्याने सुगंधाला फोन लावला. तिचा लंच टाईम होता. सगळ्या मैत्रिणी कॅन्टीनमधे डबे घेऊन जेवायला बसल्या होत्या. इतक्यात सुगंधाचा मोबाईल वाजला. मैत्रिणीनी सांगूनही जेवण अर्धवट सोडून सुगंधा मोबाईल घेऊन गैलरीत आली. राकेशचा फोन आल्याने तिला खूप आनंद झाला. दोन मिनिटे स्तब्ध शान्तत्ता होती. फक्त हुंकारच ऐकू येत होते.

“किती दिवसांनी फोन करत आहेस” सुगंधाने नाराजीने सुरवात केली. राकेशने आवश्यक तेवढी माहिती सांगून आपण का फोन करू शकत नव्हतो हे सविस्तर सांगितले. आता काश्मीरला असून नियंत्रण रेषेवर तैनात असल्याचे सांगितले. तू अभ्यासाकडे लक्ष दे. माझा विचार करू नकोस असे सांगितले. तसेच मला फोन करण्याचा प्रयत्नही करू नकोस, मला वेळ मिळाल्यावर मीच फोन करत जाईन अशी सूचना दिली.

रोजच्या चकमकीत आपले जवान कधी कधी थोडे जखमी होत होते. पहाटे २.३० वाजता राकेश व लान्सनाईक प्रकाशसिंग पेट्रोलिंग करत होते. दर २०० मीटरवर एक एक असे सात रायफलमन मागे येत होते. अचानक झाडीच्या मागून एके ४७ चा भडीमार झाला. सगळयांना पोझिशनिंगची ऑर्डर राकेशने दिली. मागे येत असलेल्या सात पैकी एका रायफलमनच्या डोक्यात गोळी घुसली. ताबडतोब सर्व तुकडी राकेशच्या ऑर्डर प्रमाणे दूर दूर विभागून डिफेन्स करू लागली. एक तास ३० मिनिटे चकमक चालू होती. नंतर शांतता पसरली. पुढचा अर्धा तास कोणीच हालचाल केली नाही. दिवस उगवायला एक तासच बाकी होता. एका पॉइंट वर सगळे जमले. राकेशने सगळयांची विचारपूस केली. जखमींवर उपचार सुरु केले. ॲम्बुलंस बोलावून डेड बॉडी हेड क्वार्टरला पाठवली.

राकेशच्या लक्षात यायला वेळ लागला नाही की लान्सनाईक प्रकाशसिंग कुठेच दिसत नाही. सर्वांना त्याचा शोध घेण्याच्या ऑर्डर देऊन स्वतः राकेश ३०० मिटर मागे जाऊन प्रकाशसिंगचा शोध घेऊ लागला. जखमी झाला असेल तर सापडेल असा विश्वास सगळयांना होता. सगळे निराश झाले. नियमाप्रमाणे राकेशने सांकेतांक वापरून कॉर्डलेसवरून वरीष्ठ

अधिकाऱ्यांना चकमकीनंतर प्रकाशसिंग सापडत नसल्याचे कळवले. पुढचे १० दिवस प्रकाशसिंगला शोधण्यासाठी मिलिटरीचे जवान प्रयत्नांची शर्थ करत होतेच, हेलिकॉप्टरने पण शोध घेतला जात होता. पण निराशा हाती आली. त्याचे शव जंगली प्राण्यांनी जंगलात ओढून नेले असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

अखेर अकराव्या दिवशी प्रकाशसिंगची डेंड बॉडी जवानांना ट्रेस झाली. त्याच्या शरीराची खूपच विटंबना केली होती. बॉडीला शीर नव्हते. धारदार शत्राने मानेपासून डोके वेगळे करून धड इथे फेकून दिलेले दिसत होते. हाताच्या बोटांना व तळपायाला चटके दिल्याचे दिसत होते. राकेशने जेव्हा प्रकाशसिंग च्या मृत शरीराची अशी विटंबना बघितली तेव्हा त्याला मोठ्याने ओरडावे, रडावे, असे वाटले. हातातल्या रायफलवर पकड इतकी घट्ट झाली की तळहातातून रक्त येत होते. जवळ उभ्या असलेल्या जवानाच्या गळयात पडून राकेश लहान मुलासारखा रडू लागला. काही क्षणासाठी राकेश विसरून गेला की तो लेफ्टनंट आहे. पुढच्या क्षणी त्याला कर्तव्याची जाणीव झाली. तत्काळ त्याने ऑर्डर द्यायला सुरवात केली. डिटेक्षन/ सर्च स्कवाड बोलवण्यात आलें. शववाहिका हजर झाली. पांढऱ्या शुभ्र चादरीत शव गुंडाळून पोस्टमार्टेम साठी पाठवण्यात आले. याचा एक दिवस जरूर बदला घेण्याचे मनोमन राकेशने ठरवले. या धक्क्यातून सावरायला राकेशला बरेच दिवस लागले. त्याची मनस्थिती पाहून त्याची हिमाचल बॉर्डर वर बदली करण्यात आली.

हिमाचल बॉर्डर वर सध्या युद्धजन्य परिस्थिती नसली तरी एका सिक्रेट मिशनवर त्याची अरुणाचलप्रदेश ब्रम्हपुत्रा नदी काठावरील एका गावात पोस्टींग झाली होती. चीनच्या तिबेटी स्वायत्त प्रदेशातून दहा पेक्षा जास्त नद्यांची निर्मिती झाली. आणि गेल्या दशकात, या क्षेत्रातील दोन मोठ्या भौगोलिक शक्तींनी भारत आणि चीन या शक्तीचा वापर करण्यासाठी जलविद्युत शर्यतीत व्यस्त होत्या. या नदीला चीनमधील यार्लुंग त्संगपो, भारत मधील सियांग आणि ब्रह्मपुत्र आणि बांगलादेशातील जमुना असे म्हणतात. अरुणाचल प्रदेश आणि आसाम आणि बांगलादेशच्या डाउनस्ट्रीम समुदायांमध्ये चीन आणि भारत या दोघांनी मेगा-बांध बांधण्याच्या योजना आणि चीनद्वारे नदीच्या पाण्याने जलविद्युत प्रकल्पांची चिंता भारताला होती. जगातील एकमेव असा पाच किलोमीटरचा ब्रिजच्या बांधकाम वेगात सुरु होते. ब्रम्हपुत्रा नदी जिच्या

पाण्याच्या प्रवाहाला प्रचंड वेग होता त्यावर हे बांधकाम होत होते. ब्रिजवरून मिलिटरी जीप, प्रचंड मोठे रणगाडे, याची वाहतूक होणार होती तर त्यावरून बोथ वे ( जाणारी व येणारी) ट्रेन रूट होते. यामुळे अंतर कमी झाले होतेच, पण अत्यंत कमी वेळेत चीन बॉर्डर वर लष्करी मदत पोहचणार होती. भारताच्या आधुनिक सिव्हील इंन्जीनियरिंग ज्ञानाची जगाला ओळख होणार होती. हे मिशन अत्यंत गुप्त पणे चालू होते, या प्रकल्पाच्या संरक्षणाची पूर्ण जबाबदारी राकेशवर होती.

घर सोडून राकेशला आता तीन वर्ष पूर्ण झाले होते. फोनवरून सगळयांशी बोलणे व्हायचे तेवढेच. उमेश आता नेट वरील कुस्तीचा मास्टर झाला होता. आई थकली होती. सुगंधाचा नर्सिंगचा कोर्सेस पूर्ण होऊन आता ती सरकारी दवाखान्यात हेड नर्स म्हणून पुण्याला सर्विस करीत होती. सगळयांना भेटण्याची ओढ राकेशला अस्वस्थ करीत होती. त्याने ३० दिवसांची रजा काढून गावी जाण्याचे नक्की केले. उमेशने व आईने खूप उत्साहाने राकेशचे स्वागत केले. येतांना त्याने दोघांसाठी खूप भेट वस्तू आणल्या होत्या. खास आईसाठी काश्मिरी शाल आणली होती. उमेशसाठी आकर्षक सोन्याचे ब्रेसलेट आणले होते. राकेशसाठी काय करू काय नको असे आईला झाले. राकेशच्या आवडीचे निरनिराळे पदार्थ आई रोज करू लागली. रोज संध्याकाळी चावडीवर बसून राकेश जमलेल्या गावकऱ्यांना आपले अनुभव सांगत असे. तरून मुलांना लष्करात भरती होण्याचे आवाहन करीत असे. त्याने व उमेशने कोल्हापूरला जाऊन पिक्चर बघण्याचा सपाटा लावला होता. सुगंधा तीन दिवसांची रजा काढून गावी आली होती. दोघे नदीवर जाऊन मन मोकळे गप्पा मारीत, त्यासाठी त्यांना दिवस पण कमी पडत होता. राकेशच्या बोलण्या, चालण्यात, वागण्यात राकटपणा आला होता. मातृभूमीसाठी वेळ आली तर जीवावर उदार होणाऱ्या राकेशचा तिला खूप अभिमान वाटायचा. तसेच सगळयांचे मन सांभाळून घरापासून दूर पुण्याला हेड नर्स असणाऱ्या सुगंधाचा राकेशला अभिमान वाटायचा. सुगंधाने हळूच लग्नाचा विषय राकेश जवळ काढला. त्यावर राकेशची काहीही प्रतिक्रिया आली नाही. तो एकदम गंभीर झाला.

“सुगंधे मी तुझ्यावर खूप प्रेम करतो, ते मी माझे भाग्य समजतो. सुखी जीवन जगण्याची इच्छा मला नाही असे तुला वाटले का? आईचे सुनमुख बघण्याचे स्वप्न पूर्ण करण्याची मला पण इच्छा आहे. पण. हा पणच फार मोठा आहे. जरा सविस्तर सांगतो. जन्म होतो. आईवडील वाढवून मोठा करतात. शिक्षण होते. लगेच नोकरी व लग्नाची घाई होते. मुलबाळ

होतात. त्यांना मोठे करणे, शिक्षण,नोकरी परत त्यांचे लग्न, नातवंड, उतारवय व शेवट. असे रुटीन जीवन मला जगायचे नाही. नाहीतर इतर जनावरांमध्ये व आपल्यात काय फरक? सगळयाच गोष्टी माणसाच्या हातात नक्कीच नसतात, पण विपरीत परिस्थितीतून मार्ग काढून जीवनात एखादे ध्येय पक्के करावे लागते. ध्येय गाठण्यात अनेक अडचणी येऊ शकतात. न डगमगता प्रयत्न करावे लागतात. मातृभूमीचे रक्षण करण्याचे माझे ध्येय आहे. समोरासमोर लढण्याची ताकद नसलेला शत्रू जेव्हा भ्याडपणाने एखाद्या भारतीय जवानाला पळउन त्याचे शीर कापून पाठवतात, त्याच्या शरीराचे कल्पनाही करता येणार नाही अशी विटंबना करतात. हे डोळयांनी मी बघीतले आहे. रक्त जळते, डोळयात अंगार उतरतो, मस्तकाची नस अन नस ताडताड उडायला लागते, तेव्हा असे वाटते की ब्रम्होस सारख्या मिसाईलने मारा करून शत्रूचे रक्ताचे पाट वाहू द्यावे. जोपर्यंत मी माझे हे स्वप्न पूर्ण करीत नाही तोपर्यंत मी तुला लग्नाचे आश्वासन देऊ शकत नाही." मनातील जखम लौकर बरी होण्यातली नव्हती याची सुगंधाला कल्पना होती.

तिने राकेशला जवळ घेऊन बराच वेळ डोके थापटले. उन्हे उतरायला लागली होती. वेळेचे दोघांनाही भान नव्हते.

रजा ३० दिवसांची होती. १८ दिवस पूर्ण झाले होते. राकेश सगळयांच्या सहवासात आनंदी होता. पण नियतीला ते बघवले नाही. दुपारी ३ वाजता पोस्टमन टेलीग्राम घेऊन आला. राकेशला परत काश्मीर बॉर्डर वर रिपोर्ट करायचे होते. सगळे अचंबित आणी नाराज झाले. सगळयांच्या उत्साहावर पाणी फिरले होते. पण काही इलाज पण नव्हता. सगळयांचा निरोप घेऊन राकेश जम्मूला जाण्यास निघाला. जम्मू स्टेशन वर लान्सनाईक राय त्याला रिसीव्ह करायला आला होता. कडक सॅल्युट झाल्यावर मिलिटरी जीपमध्ये बसून प्रवास सुरु झाला. जीप डायरेक्ट मिलिटरी हेड क़्वाटरला पोहचली तेव्हा राकेशला फार आचर्य वाटले. कितीही उत्सुकता, कुतुहूल वाटले तरी ती व्यक्त न करण्याची शिस्त लष्करात होती. दोन मिनिट कर्नल साहेबांच्या केबिन बाहेर राकेशला वाट पहावी लागली.

कर्नल अभयसिंगच्या समोर राकेश उभा होता. त्यांच्या भव्य पर्सनालीटीने भारून गेला. सीट डाऊन. तुझ्या रेकॉर्ड वरून मी तुला चागले ओळखतो. फक्त दहा मिनिटच आपण बोलणार आहोत. इथुन पुढे तुझे नाव सतलज असेल. तू युनिफोर्म घालायचा नाही. तू अत्यंत गोपनीय कामगिरीवर नियुक्त झाला आहेस. दर दोन दिवसांनी तुझे हे नाव बदलले जाईल. तुला

आता मिस्टर रोझला नंगा पर्वत स्पॉटवर रिपोर्ट करायचे आहे. यापेक्षा जास्त माहिती मी तुला देऊ शकणार नाही.

नंगा पर्वत स्पॉटवर राकेश पोहचला तेव्हा प्रचंड थंडी होती जी स्वेटर, जर्सी घालून सुद्धा हाडांपर्यंत जात होती. दोन तास भ्रमंती नंतर सुद्धा त्याला कोणीच दिसेना. चारपाच प्राणी फिरताना दिसत होते. जवळ एक माणूस शाल पांघरून हातात काठी घेऊन झाडाखाली बसला होता. थकून राकेश त्याच्या समोरच्या झाडाखाली बसला. एकतासानंतर कंटाळून राकेश उठला तेवढ्यात समोरच्या माणसाने त्याला हाताने जवळ बोलावले व अस्खलित मराठीत बोलायला सुरवात केली. तुझे नाव काय रे बाबा ? कुणाला शोधत आहेस का? याला नंगा पर्वत म्हणतात. येथे माणूस औषधाला पण सापडणार नाही. तू कसा काय भटकला आहेस? राकेशने त्याचे निरीक्षण केले. तो उंच, धिप्पाड होता. राकेश त्याच्या जवळ बसला. तुम्ही मराठी का? राकेशने सुरवात केली. हो मी नागपूर जवळील एका खेड्यातील आहे. पण मी मराठी आहे हे तुम्हाला कसे कळाले, आपण तर काही बोललोच नव्हतो. बरोबर आहे राजे. तुमच्या विषयी मला सगळी माहिती आहे. तुझे नाव राकेश आहे. तू रोझ नावाच्या माणसाच्या शोधात आहेस बरोबर ना? मग मीच रोझ आहे. त्याने असे म्हणताच राकेश खाडकन उठून उभा राहिला व रोझला सॅल्युट केला. सर मी तुम्हाला ओळखू शकलो नाही क्षमा करा. राकेश भांबावून गेला. डोंट वरी मी कर्नल गेडाम पण आता रोझ. या सिक्रेट मिशन असतांना आपले हेच नाव असणार आहे मिस्टर सतलज, समजले?

चार दिवस रोझ बरोबर काढल्यानंतर एके दिवशी रात्री १२.३० वाजता वायरलेसवरून मेसेज आला. ऑपरेशन ब्लाक क्लौड स्टार्ट. एक वाजून १० मिनिटांनी एक मिलिटरी हेलिकॉप्टर उतरले. त्यात दोन कमांडो सर्व विनाशकारी अनिमिशेन सहित होते. दोघांनी सॅल्युट केले. रोझ कामगिरीचे नेतृत्व करणार होता. कुठे जायचे? काय करायचे? काहीच माहिती नव्हते. फक्त ऑर्डर फालो करायच्या एवढेच इन्स्टक्शन होते. हेलिकॉप्टर चालू झाल्यावर खिशातून रोझने एक नकाशा काठला. पाक सिमेरेषेच्या आत तीन ठिकाणी रेड क्रॉस होते. रोझने सांगितले या ठिकाणी हल्ला करून, उध्वस्त करायचे आहेत. लष्कराच्या आपल्यासारख्या अनेक टीम या कामगिरीवर नियुक्त आहेत. आपल्याला दिलेल्या वेळेच्या आत बमबारडींग करून, काम फत्ते करून आपले कुठलेही नुकसान म्हणजे जीवित हानी न होता परत यायचे आहे. आल्यावर

सांकेतिक सिंग्नल दिल्यावर दिल्ली हेड क़्वाटरला रिपोर्ट करायचा आहे. पोचायला ३० मिनिटे परत यायला ३० मिनिटे व टार्गेट नष्ट करण्यासाठी फक्त १५ मिनिटे वेळ आहे. टोटल ७५ मिनिटे अलौट केली आहेत. आता आपण टार्गेट जवळ पोहचलो आहे. ओके. बी. अलर्ट एन्ड स्टार्ट. गुड लक.

पुढच्या १५ मिनिटे धुवाधार फायरिंगचे आवाज येत होते. वेळ रात्रीचे २.३० वाजले होते. बॉम्ब मुळे अनेक ठिकाणी आगीचे भडके उडालेले दिसत होते. तिन्ही टार्गेटची हीच अवस्था केली गेली होती. कामगिरी फत्ते झाल्यावर सांकेतिक सिंग्नल दिला गेला व हेलिकॉप्टर दिल्ली हेड क़्वाटरच्या दिशेने निघाले. परेड ग्राउंडवर अनेक कमांडोज, वरिष्ठ अधिकारी स्वागतासाठी आलेले होते. नंतर कळले सर्जिकल स्टाईकची ही कामगिरी १००% फत्ते झाली होती.

एकही जवान धारातीर्थी पडला नव्हता. शत्रूचे ३९ जवान मारले गेले होते. या घटनेने संपूर्ण जगाला हादरा बसला होता. भारताच्या लष्करी ताकदीची ओळख पटली होती. पाक तर आतून हादरले होते. पण असे काही सर्जिकल स्टाईक झालेच नाही असा कांगावा त्यांनी सुरु केला. हे नेहमीचेच झाले होते. भारतीय जवानांचे शीर कलम करणे किती महागात पडू शकते याची धास्ती पाकने नक्कीच घेतली. राकेशचा उर अभिमानाने भरून आला.

राकेश १५ दिवसांची रजा काढून घरी जाण्याचा विचार करत होता तेवढ्यात त्याला पाक व्याप्त काश्मीर बॉर्डर वर जाण्याची ऑर्डर मिळाली. राकेशला आता जरासा होम सिकनेस जाणवत होता. नियमितपणे पेट्रोलिंग सुरु होते. रजेचा अर्ज मंजुरी साठी पाठवला होता. पहाटेचे ४ वाजून २० मिनिटे झाली होती. त्याच्या मागे पुढे २०० मीटरवर जवान होते. अचानक फायरिग सुरु झाली. कुठल्या दिशेने फायरिंग होत आहे कळत नव्हते. एक गोळी डाव्या खांद्यावरून गेली त्याच वेळी दुसरी गोळी डाव्या तळहातात खुसली. राकेश कोलमडला. क्षणात सावरला. AK47 उजव्या हातात घट्ट पकडली. हाफ राउंड घेत धुवाधार फायरिंग चालू ठेवली. प्रतिसाद कमी झाल्याचे जाणवले तसे दोन मिनिटे थांबून राकेशने दीर्घ श्वासोच्छवास घेतला. तेवढ्यात चारी बाजूंनी त्याच्यावर हल्ला झाला. सावरायला वेळ मिळायच्या आधीच त्याला

जेरबंद करण्यात आले. मुसक्या बांधून एका पाक जीपमध्ये कोंबून पाकच्या एका लष्करी ठाण्यावर नेण्यात आले.

दोन दिवस त्याला उपाशी ठेवण्यात आले. नंतर एका मोठ्या हॉल मधे पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यासमोर उभे करण्यात आले. त्याने प्रश्न विचारायला सुरवात केली. बोलो सुवर तुम्हारा नाम क्या है. तुम लेफ्टनंट है ना? तुम्हारे कर्नल का नाम बताव. सुखोई के बारेमे तुम क्या जानते हो? त्याने काहीच प्रतिसाद न दिल्याने नंतर काही तासांनी त्याचे हात मोकळे करण्यात आले. बोटांना जळत्या सिगारेटचे चटके देण्यात आले. राकेश जीवाच्या आकांताने ओरडत होता. पण त्याने कुठल्याच प्रश्नाचे उत्तर दिले नाही. दोन तास त्याचा छळ केल्यावर कंटाळून तो अधिकारी निघून गेला. जातांना त्याने ऑर्डर दिली की, अगर ये बंदा जवाब नही देता है तो उसकी बोटीबोटी अलग करके सीमा के उसपार फेक दो. वो जिंदा नही रहना चाहिये.

भारतीय लष्करातील एक अधिकारी सावज मिळाल्यामुळे त्यांना खूप आनंद झाला होता. पाक अधिकारी निघून गेल्यावर त्यांनी आनंद साजरा करण्यासाठी दारूच्या बाटल्या काढल्या. त्या नशेत राकेशच्या डाव्या तळहाताला जिथे गोळी त्या जखमेवर संगीन खुपसत होते. वेदनेने तो तडपत होता. तरी चेहऱ्यावर गूढ हास्य होते. लष्करातील ट्रेनिंगमधे खास योगाचे धडे शिकवले होते. त्याचा हुशारीने उपयोग करण्याचा विचार त्याच्या डोक्यात घोळत होता. त्याने मुद्दाम सर्व शरीर ढिले सोडून दिले. डोळे मिटून शवासनात मग्न झाला. डोळ्यापुढे आईचा आश्वासक चेहरा आला, मन शांत झाले. शरीराच्या वेदनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. किती काळ गेला समजले नाही.

त्याला मृत समजून सीमारेषेकडे नेण्यात येत होते. त्याने थोडी सुद्धा हालचाल केली नाही. बॉर्डरवर आणून त्याला फेकून देण्यात आले. राकेश निपचित पडला होता. ३० मिनिटे राकेश तसाच पडून राहिला. बुटांचे आवाज जवळ येत असल्याचे त्याला जाणवले. हे भारतीय लष्करातील जवान नक्कीच नव्हते. का परत आले असावे? की आपण मृत नाही हे त्यांना समजले असेल? काहीही असो त्याने निपचित पडून राहण्याचे ठरवले. दोघांचे आवाज येत होते. अरे शब्बू यही तो कही उसको फेका है ना? ओ तो मरा हुआ है, ठीकसे देख. जनाबने भी क्या काम दिया , वो मरे आदमीका सर कलम करनेका! क्या जरुरी था? बहोत दिनके बाद मौका मिला था चार बोतल पी सकते थे.

बोलता बोलता त्याचा पाय राकेशच्या डाव्या हातावर पडला क्षणाचीही उसंत न घेता राकेशने उजव्या पायाची लाथ कसून त्याचा प्रायव्हेट पार्ट वर मारली. तो कळवळून खाली बसला. सेकंदात राकेशने त्याच्या AK47 चा ताबा घेतला व डोळे मिटून फायरिंग सुरु केले. डोळे उघडून भघीतले तर दोघेही ढेर झाले होते. राकेशच्या डोळ्यातून अविरत अश्रू व्हायला लागले. भारतीय हेलिकॉप्टर राकेशच्या शोधात रॉउंड मारतच होते. त्यातील एका हेलिकॉप्टरला झाडीत राकेश असावा असा डाउट आला. कारण तेथे फायरिंग होत असल्याचे त्या जवानाने बघीतले होते. खात्री झाल्यावर सेफ लँडिंग करण्यात आले. राकेश बेशुद्ध होता.

राकेश शुद्धीवर आला तेव्हा तो दिल्लीतील लष्करी हॉस्पिटल मधील आय.सी.यु. मधे होता. बाजूला आई, उमेश, जोशीकाका, अग्रवाल काका दिसत होते. त्याची नजर अजून भिरभिरत होती. कोणाला शोधीत होती याचा अंदाज जोशीकाकांना आला होता. बेटा काही काळजी करू नकोस. मांजर डोळे मिटून दुध पीत असली तरी सगळ्यांना कळते बर का ! अग्रवाल काकांनी तुला जावई करून घ्यायचे मान्य केले आहे. सुगंधाचा अन तुझ्या लग्नाचा बार लौकरच उडवणार असे आईने पण ठरवले आहे. तेवढ्यात एका थर्मास मधे सुगंधा चहा घेऊन आली. राकेशला आपल्याकडे बघताना बघून लाजेने चूर झाली. त्याच्या लग्नाला उच्चपदस्थ लष्करी अधिकारी आले होते. महिनाभर गावात सगळीकडे आनंदीआनंद साजरा केला गेला.

पुढच्या वर्षी २६ जानेवारीला राकेशला परिवारासह दिल्लीला बोलावून राष्ट्रपतींच्या हस्ते वीरचक्र देउन गौरव करण्यात आला. उमेशने नेटवरील कुस्तीचा नाद सोडून राकेश प्रमाणे सैन्यात भरती होण्याचे ठरवले. अशाच ध्येयवेड्या तरुणांची आज भारताला गरज आहे नाही का?

०००

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा

अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान